महानिर्मिती

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित


महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९.

दुरध्वनी०२२-२४०७७४४१/४२/४३website :www.mahagenco.in Email ID - dygmhr1@mahagenco.in


क्र. महानिर्मिती/मासं-१/तंत्रज्ञ-३/(राज्यस्तरीय)/CVD-१९/LDN/ऑगस्ट२०/३९४७ दिनांक :-२५/०८/२०२०

## जाहिरात क्र.०४/२०१९ अंतर्गत तंत्रज्ञ-३ पदासाठी कागदपत्रे पडताळणी अनुषंगाने निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासणी कार्यवाहीबाबत.

**संदर्भ :-** १) महानिर्मिती जाहिरात क्रमांक ०४/२०१९

२) महानिर्मिती सूचना क्रमांक ८४९ दिनांक २४.०१.२०२०.

३) महानिर्मिती सुधारीत गुणांची सूचना क्रमांक १५३१ दिनांक ११.०२.२०२०.

४) तंत्रज्ञ-३ या पदाची अंतिम निवड यादी दिनांक २९.०२.२०२०.

५) मासं-सेप्र विभागामार्फत प्राप्त कार्यालयीन टिप्पणी क्रमांक ७६ दिनांक ०६.०३.२०२०.

६) मंजुर कार्यपध्दती कार्यालयीन टिप्पणी क्रमांक ६५ दिनांक १८.०८.२०२०

---

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०४/२०१९ अंतर्गत "तंत्रज्ञ-३" या पदाच्या भरतीसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या "तंत्रज्ञ-३" यांच्या रिक्त पदांची उपलब्ध संख्या व समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेवून उमेदवारांची "तंत्रज्ञ-३" या पदाकरिता कागदपत्रे पडताळणीच्या अधीन राहून निवड झालेल्या उमेदवारांची सद्यस्थितीत कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली परिस्थिती व त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचा विचार करता कागदपत्रे पडताळणीबाबतची यादी ही खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१) उमेदवारांची सदरील यादी ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता,वय,जात,उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,अनाथ, खेळामधील प्राविण्य, माजी सैनिक, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण,महिला आरक्षण, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून इत्यादीबाबत लागू असणाऱ्या सर्व मूळ प्रमाणपत्राची / कागदपत्राची तपासणी करण्यात येईल.

२) सदरील यादीतील सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, जात वैधता, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त, अनाथ, खेळामधील प्राविण्य, माजी सैनिक, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी सर्व लागू असणारी मूळ प्रमाणपत्रे कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) अंतिम निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी विविध समांतर व सामाजिक आरक्षणांतर्गत अर्ज सादर केले असल्यास त्याबाबतचे जाहिरातीतील अटी व शर्ती तसेच शासनाने पारित केलेले संबंधित आरक्षणांतर्गत नियम व शर्तींच्या अनुषंगाने कागदपत्रे सादर करणे ही संपूर्णत: उमेदवाराची जबाबदारी आहे. तसेच सदरील कागदपत्रे उमेदवारांनी सादर न केल्यास, उमेदवाराची निवड ताबडतोब रद्द करण्यात येईल.

४) ज्या महिला उमेदवारांची निवड ही खुल्या प्रवर्गात महिला आरक्षणातंर्गत (WR) करण्यात आलेली आहे, अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन "तंत्रज्ञ-३" या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक ०८.०९.२०१९ पर्यंत किंवा कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापर्यंत प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे.

५) "तंत्रज्ञ-३" पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

६) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन "तंत्रज्ञ-३" या रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक ०८.०९.२०१९ पर्यंत किंवा कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापर्यंत प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे. वैध कागदपत्रे नसतील अशा उमेदवारांची उमेदवारीताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता ही जाहिरातीस अनुसरुन "तंत्रज्ञ-३" पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

७) खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२ दिनांक १८.०८.२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक राक्रीधो/२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ११.०३.२०१९ नुसार "तंत्रज्ञ-३" या पदांच्या निवडीकरीता वैध आहेत अथवा नाहीत याबाबतच्या अहवालाकरीता संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य यांच्याकडून उमेदवाराने स्वत: खेळाडू प्रमाणपत्राची पडताळणी करुन त्यासंबंधीची कागदपत्रे विद्युत केंद्रातील पडताळणीवेळी जमा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा अहवाल संबंधित उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर तसेच उमेदवाराने तो या कार्यालयास सादर केल्यानंतर पात्र उमेदवाराला नियुक्तीपत्र निर्गमित करण्यात येईल.

८) "तंत्रज्ञ-३" या पदाची सदरील अंतिम निवड यादी तयार करताना ऑनलाईन परीक्षेत समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे, महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल. तद्नंतर २ किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असल्यास उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील जेष्ठताक्रम ठरविण्यात आलेला आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) "तंत्रज्ञ-३" या पदाची सदरील यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनवधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

१०) कागदपत्रे तपासणीकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी गैर मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

११) सदरील कागदपत्रे पडताळणी यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१२) कागदपत्रे तपासणी करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंतीचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३) अपात्र उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नयेत. अशा उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही.

१४) कागदपत्रे तपासणी करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज,त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) कागदपत्रे पडताळणी अनुषंगाने जमा करणेकरीता स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे तपासणी करण्याकरीता त्यांच्या नावासमोर नमूद कार्यालयात नेमून दिलेल्या दिवशी व वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्रे जमा केलेनंतर उमेदवारास संबंधित कार्यालयामार्फत पोच देण्यात येईल. नमूद दिनांक व वेळेत कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत पुन्हा दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१५) सदरील कागदपत्रे पडताळणी यादीत प्रस्तावित करण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रस्तावित कार्यस्थळ अथवा वेळ यामध्ये बदलाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६) कागदपत्रे तपासणी करण्याकरीता उमेदवारास त्यांच्या जिल्हयानजीकच्या औ.वि.केंद्राअंतर्गत उपस्थित रहातेवेळी सद्यस्थितीत असलेला कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव यांचा विचार करता सदर विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी सामाजिक अंतर राखणे, मास्क, सॅनिटायझर इत्यादी उपाययोजनांचे पालन करुन तसेच आवश्यकतेनुसार प्रवासाबाबत पुर्वपरवानगी (E-Pass) प्राप्त करुन घेणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित उमेदवाराची असेल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१७) कागदपत्रे तपासणी करण्याकरीता उपस्थित रहातेवेळी उमेदवारांनी त्यांचे शारिरीक तथा वैद्यकीयदृष्टया तंदुरुस्त असल्याबाबतचे M.B.B.S. डॉक्टर यांचेकडुन प्रमाणित केल्याचे मुळ Fitness Certificate सादर करणे अनिवार्य राहील. वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास कागदपत्र तपासणीकरीता प्रवेश दिला जाणार नाही याची उमेदवारांनी जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

१८) शारिरीकदृष्टया व्यंग असलेल्या उमेदवारास त्याच्यासोबत सहाय्यकाची आवश्यकता असल्यास उमेदवारासोबत एका सहाय्यकास प्रवेश देण्यात येईल. तथापि, प्रवेशाकरीता सोबत जाणाऱ्या सहाय्यकानेही त्यांचे शारिरीक तथा वैद्यकीयदृष्टया तंदुरुस्त असल्याबाबतचे M.B.B.S. डॉक्टरांकडुन निर्गमित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच सहाय्यक म्हणुन प्रवेशाची मागणी करणाऱ्या व्यक्तीने त्याचे शासन प्रमाणित छायाचित्र असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स,मतदान ओळखपत्र इत्यादी) याची छायाप्रत सादर करणे अनिवार्य राहील. तसेच सदरहु दस्तऐवजांची मुळ प्रतही सोबत बाळगावी. (सदर प्रवेशाबाबतचे सर्व अधिकार हे महानिर्मिती प्रशासनास राहतील.)

१९) कागदपत्र तपासणीकरीता उपस्थित रहाणेकरीता उमेदवारास नेमुन दिलेल्या दिनांका दिवशी उमेदवाराचे कोविड-१९ प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनामार्फत विलगीकरण करुन त्याची रवानगी संबंधित विलगीकरण कक्षात केली असेल अथवा त्यास त्याच्या घरामध्ये विलगीकरणात ठेवले असेल तर उमेदवाराने त्याबाबतचा सबळ पुराव्यासह पुढील ईमेलवर srmanagerhr1@mahagenco.in त्याला तपासणीकरीता नेमुन दिलेल्या तारखेच्या एक दिवस आधीपर्यंत सूचित करणे क्रमप्राप्त राहील. तपासणीकरीता नेमुन दिलेल्या दिनांकास किंवा तद्नंतर या अनुषंगाने प्राप्त ईमेलबाबत कोणतीही नोंद प्रशासनामार्फत घेतली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. वेळेत ईमेलद्वारे प्राप्त अहवालाच्या अधिन राहुन संबंधितांच्या कागदपत्र तपासणीबाबत निर्णय घेऊन संबंधितास तसे स्वतंत्ररित्या सूचित करण्यात येईल.

२०) कागदपत्र तपासणीकरीता उपस्थित रहातेवेळी अनावश्यक गर्दी टाळणेकरीता औ.वि.केंद्रामध्ये फक्त उमेदवारासच त्याचे शारिरीक तापमान तसेच शरीरातील ऑक्सिजनची मात्रा तपासणीअंती प्रवेश दिला जाईल. तपासणीअंती शंकास्पद उमेदवारांना सदर प्रक्रियेकरीता त्या दिवशी त्याच्या नावाची नोंद घेऊन तसेच संबंधितास तसे लेखी पत्राद्वारे सूचित करणेत येईल. संबंधितांच्या कागदपत्रे तपासणीबाबत निर्णय घेण्यात येईल व तसे स्वतंत्ररित्या सूचित करण्यात येईल. तसेच सदर कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेदरम्यान कोविड-१९ प्रादुर्भावास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कागदपत्र तपासणी सुची अनुषंगाने उमेदवारांची यादी उपरोक्त सूचना तथा जाहिरातीत नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रस्तावित विद्युत केंद्रनिहाय कागदपत्र पडताळणीकरीता खालील प्रमाणे यादी प्रसिध्द करण्यात येतआहे.**

उमेदवारांनी "तंत्रज्ञ-३" या पदाच्या कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित रहावयाच्या कार्यालयाचा तपशिल प्राप्त करण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ← करावे.

**"तंत्रज्ञ-३"या पदाकरीताकागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहुन अंतिम निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्र पडताळणीकरीता प्रस्तावित कार्यस्थळ व दिनांक याबाबतची तपशिल यादी.**

"तंत्रज्ञ-३" या पदाच्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(भि.य.मंता)
कार्यकारी संचालक (मासं)